**अनुसचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या महसूली क्षेत्रीय आस्थापनेवरील महसूल सहायक यांच्याकरीता निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांना मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०६/आस्था-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १२ मे, २०२६.

**संदर्भ:-**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२१/१२/२०१९.
२. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.१८७अे/१६-ब, दि.३०/०६/२०२०
३. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्र.बीसीसी-२०१९/प्र.क्र.५८१अे/१६-ब, दि.१४/१२/२०२२.
४. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णयक्र.बीसीसी-११२३/प्र.क्र.२९/सुधारणा-२, दि.४/१०/२०२४.
५. सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.बीसीसी-११२४/प्र.क्र.४५/आरक्षण-२(१६-ब) दि.०७/०५/२०२४.
६. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.ईएसटी-२०२०/प्र.क्र.८१/ई-८, दि.२०/११/२०२०.
७. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.ईएसटी-२०११/प्र.क्र.११४/ई-८, दि.१३/०८/२०२१.
८. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०५/आस्था-८, दि.१२/०३/२०२६
८. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे पत्र क्र.मशा/आस्था/कार्या-४/इएनजी/ मुदतवाढ प्रस्ताव/कावि-३१६२१८०/२०२५, दि.१६/०४/२०२६.

**प्रस्तावना:-**

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि.०६/०७/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.०१ येथील शासन निर्णयास अनुसरुन संदर्भ क्रमांक ६ व ७ येथील शासन निर्णयान्वये, महसूल विभागातील महसूल सहायक (लिपीक टंकलेखक), गट-क संवर्गातील २८ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.०२ येथील शासन निर्णयान्वये, अधिसंख्य पद निर्माण करण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आले आहेत. तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १४/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना सेवाविषयक तसेच सेवानिवृत्तीचे लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांच्या अधिनस्त असलेल्या आस्थापनेवरील अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्ती मिळालेल्या तथापि, सदर प्रवर्गाची जात वैधता सादर करु न शकणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांना १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्याकरीता अधिसंख्य पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

जिल्हा निवड समिती शिफारसपात्र उमेदवार म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर लिपीक-टंकलेखक या पदावर अनुसचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या महसूली क्षेत्रीय आस्थापनेवरील महसूल सहायक (लिपीक टंकलेखक) संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या पदांना १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्याकरीत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | नियुक्तीचा दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | ११ महिन्याच्या सेवा समाप्ती/ अधिसंख्य पदावर सेवा समाप्तीचा दिनांक | तांत्रिक खंडाचा दिनांक | नियुक्तीस पुढील ११ महिन्यासाठी खालील कालावधीसाठी मुदतवाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १ | श्री.गुडालोड साईनाथ रामकिसन | ०७/११/२०१५ | ३१/०८/२०४७ | २४/०५/२०२६ | २५/०५/२०२६ | २६/०५/२०२६ ते २५/०४/२०२७ |
| २ | श्री.सत्तावन सजनसिंग भावसिंग | २०/११/२०१५ | ३०/०४/२०५० | २४/०५/२०२६ | २५/०५/२०२६ | २६/०५/२०२६ ते २५/०४/२०२७ |
| ३ | श्रीम.वर्षा अनंतकुमार देवळे | २०/०७/२०१६ | ३१/०५/२०५३ | २४/०५/२०२६ | २५/०५/२०२६ | २६/०५/२०२६ ते २५/०४/२०२७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | श्री.निवृत्ती कोंडीबा तोटेवाड | ०४/१२/२०१५ | ३१/०५/२०४५ | २४/०५/२०२६ | २५/०५/२०२६ | २६/०५/२०२६ ते २५/०४/२०२७ |
| ५ | श्रीम.जयश्री दंगल कोळी | १८/११/२०१५ | ३०/०६/२०४९ | १६/०३/२०२६ | १७/०३/२०२६ | १८/०३/२०२६ ते १७/०२/२०२७ |

उपरोक्त तक्त्यामध्ये **नमूद** ०५ महसूल सहायक संवर्गातील अधिसंख्य पदांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २१/१२/२०१९, दिनांक ३०/०६/२०२० व दिनांक ०४/१०/२०२४ या शासन निर्णयातील तरतूदीनुसार तात्पुरत्या स्वरुपात पुढील ११ महिन्यांकरिता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत उपरोक्त वरील तक्त्यामधील अ.क्र.१,२,३ व ४ या कर्मचाऱ्यांचे (दि.२५/०५/२०२६) रोजीचा १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ११ महिन्याच्या कालावधीकरीता म्हणजेच (दि.२६/०५/२०२६ ते दि.२५/०४/२०२७) व तक्त्यामधील अ.क्र.५ मधील कर्मचाऱ्याचे (दि.१७/०३/२०२६) रोजीचा १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ११ महिन्याच्या कालावधीकरीता म्हणजेच (दि.१८/०३/२०२६ ते १७/०२/२०२७) मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात येणारे कर्मचाऱ्यांपैकी सेवेत कार्यरत कर्मचारी, सध्या ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदाकरिता निर्माण करण्यात आलेले अधिसंख्य पद तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरिता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत सदर अधिसंख्य पदे अस्तित्वात राहील.

३. सदर अधिसंख्य पदावरील मुदतवाढीस सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.१४/१२/२०२२ अन्वये देण्यात आलेला तांत्रिक खंड सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, दिनांक ०४/१०/२०२४ मधील तरतुदीनुसार सर्व सेवाविषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवानिवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात येत आहे.

४. सदर अधिसंख्य पदांच्या वेतनावर येणारा खर्च हा संबंधित अधिकारी सध्या ज्या महसूली विभागात कार्यरत आहेत त्या विभागाच्या वेतनासंबंधीच्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन दि.२१/१२/२०१९, दि.३०/०६/२०२० व दि.०४/१०/२०२४ रोजीच्या अथवा त्यासंबंधी वेळोवेळी सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील नमूद सूचनानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाची यांची राहील.

६. सदर शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९, दिनांक ३०/०६/२०२० व दिनांक ०४/१०/२०२४ या शासन निर्णयातील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५१२१०२६५३८०१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D36A0A6455652C60EA76104DD537113A9CA67AB14A315B9CEFC36FC9BE2915F8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2026.05.12 10:27:55 +05'30'

**( अजित देशमुख )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. अ.मु.स. ( महसूल ) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय,मुंबई-३२
४. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण.
५. जिल्हाधिकारी, पालघर, जि.पालघर
६. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर
१०. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई - ३२.
११. सामान्य प्रशासन विभाग, ( कार्यासन-१६-ब), मंत्रालय, मुंबई - ३२.
१२. महसूल व वन विभाग, कार्यासन आस्था-७, मंत्रालय,मुंबई - ३२.
१३. निवड नस्ती (आस्था-८)